जबाब दि.24/12/2024

मी सुशांत रूपक जाधव वय–36 वर्षे, धंदा–शेती रा.आसनपोई ता.महाड जि.रायगड मोबा.नं.7276572423 समक्ष महाड एमआयडीसी पोलीस ठाणे येथे हजर राहून जबाब लिहून देतो की,

मी वरील ठिकाणचा राहणारा असुन तेथे मी माइया कुंटूबासह राहतो. मी शेती करून माइया कुंटूबाचा उदरनिर्वाह करीत असतो.

आमचेकडुन दिनांक 25/12/2024 रोजी महाड एमआयडीसी पोलीस ठाणे हददीतील पिंपळवाडी येथे रेडयांच्या झोंब्याचे आयोजन करून त्याची जाहीरात ही सोशल मिडीयावर प्रसारीत करण्यात आली होती. परंतु रेडयांच्या झोंब्या लावणे, प्राण्यांचा छळ करणे त्यांना वेदना पोहचवणे, कोणत्याही प्राण्यांची मनोरंजनासाठी लढत लावणे. त्यावर बक्षीस ठेवणे,सट्टेबाजी लावणे. या सर्व बाबींकरीता जागा उपलब्ध करून देणे तसेच त्याचे आयोजन करणे, त्याची जाहीरात करणे हा कायद्याने गुन्हा आहे. ही माहीती आम्हास अवगत झाल्याने आम्ही दिनांक 25/12/2024 रोजी महाड एमआयडीसी पोलीस ठाणे हददीतील पिंपळवाडी येथे रेडयांच्या झोंब्याचे आयोजन केले होते ते आम्ही रद्द करीत आहोत. तसेच सध्या संपुर्ण रायगड जिल्हयामध्ये माजिल्हाधिकारी सो. रायगड अलिबाग यांचेकडील आदेश कमांक गृह शाखा क.गृह/एमएजी –1/अधिसुचना/37(1)(3)2023 दिनांक 13/12/2024 अन्वये दिनांक 12/12/2024 ते दिनांक 26/12/2024 रोजी पर्यत रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे कार्यक्षेत्रात पारित झालेल्या आदेशाप्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37 (1)(3) अन्वये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कोणत्याही जमावास किंवा मिरवणूकीस मनाई आदेश पारित करण्यांत आलेले आहेत. या अनुशंगाने आम्हाकडुन कोणत्याही प्रकारे कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची खबरदारी आम्ही घेत आहोत.

माझा वरील जबाब मी वाचुन पाहीला तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरा असुन तो संगणकावर टंकलिखित केलेला आहे.

समक्ष

सहा.पोलीस निरीक्षक
महाड एमआयडीसी पोलीस ठाणे

हा जबाब लिहुन दिला

महाड एमआयडीसी पोलीस ठाणे, ता.महाड, जि.रायगड
पत्ता :–नांगलवाडी फाटा, एमआयडीसी रोड, ता.महाड
जिल्हा–रायगड,
पिन कोड – 402309,दुरध्वनी क्रमांक – 02145–233010
ई–मेल आयडी :–1 ps.mahadmidc.rd@mahapolice.gov.in
2 rgdmahadmidcps.@gmail.com

जावक कमांक / महाड MIDC / 2024– 374 दि. 24 / 12 / 2024

# भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023 चे कलम 168 अन्वये नोटीस

प्रति,
श्री.सुशांत रूपक जाधव
रा.आसनपोई ता.महाड जि.रायगड

आपणांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आपणामार्फत दिनांक 25 / 12 / 2024 रोजी महाड एमआयडीसी पोलीस ठाणे हददीतील पिंपळवाडी येथे रेडयांच्या झोंब्याचे आयोजन करून त्याची जाहीरात ही सोशल मिडीयावर सुरू असुन रेडयांच्या झोंब्या लावण्यासाठी कायदेशीर बंदी घालण्यात आलेली आहे.तसेच प्राण्यांचा छळ करणे त्यांना वेदना पोहचवणे. कोणत्याही प्राण्यांची मनोरंजनासाठी लढत लावणे. त्यावर बक्षीस ठेवणे,सट्टेबाजी लावणे. या सर्व बाबींकरीता जागा उपलब्ध करून देणे तसेच त्याचे आयोजन करणे, त्याची जाहीरात करणे हा कायद्याने गुन्हा आहे.

त्याअर्थी सध्या संपुर्ण रायगड जिल्हयामध्ये माजिल्हाधिकारी सो.रायगड अलिबाग यांचेकडील आदेश क्रमांक गृह शाखा क्र.गृह / एमएजी –1 / अधिसुचना / 37(1)(3)2023 दिनांक 13 / 12 / 2024 अन्वये दिनांक 12 / 12 / 2024 ते दिनांक 26 / 12 / 2024 रोजी पर्यत रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे कार्यक्षेत्रात पारित झालेल्या आदेशाप्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37 (1)(3) अन्वये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कोणत्याही जमावास किंवा मिरवणूकीस मनाई आदेश पारित करण्यांत आलेले आहेत.

त्याअर्थी आपणामार्फत दिनांक 25 / 12 / 2024 रोजी महाड एमआयडीसी पोलीस ठाणे हददीतील पिंपळवाडी येथे रेडयांच्या झोंब्याचे आयोजन करून त्याची जाहीरात ही सोशल मिडीयावर जाहीरात प्रसारीत करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी मी जीवन कांचन हिंदुराव माने सहा.पोलीस निरीक्षक महाड एमआयडीसी पोलीस ठाणे जि.रायगड याद्वारे आपणास सुचित करण्यात येते की, आपणाकडुन अगर आपले हस्तकाकरवी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या असे कोणतेही कायद्याचे उल्लंघन होणार नाही. ज्यामुळे शांतता भंग होवुन अदखलपात्र किंवा दखलपात्र उपराध घडुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल. आपणास असे सुचित करून देखील आपणाकडुन कोणतेही शांतता भंग होईल असे कृत्य घडल्यास आपलेविरूद्ध सदर नोटीसचा भंग केला म्हणुन भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 223 प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस ही मी माझे सही शिक्यानिशी दिली आहे.

कळावे,

ठिकाण– महाड एम.आय.डी.सी.
दिनांक– 18 / 11 / 2024

सहा.पोलीस निरीक्षक सो.
महाड एमआयडीसी पोलीस ठाणे

Scanned with ACE Scanner